नेहरूनगर पोलीस स्टेशन हद्दी मध्ये वसलेले व बहुसंख्य मुस्लिम वस्ती असलेले जागृती नगर येथे " कुर्ला कदम एस आर ए सहकारी गृहनिर्माण संस्था असून तिचे पुनर्वसन प्रकल्प चे काम एस आर ए मार्फत सुरू होत आहे. सदर ठिकाणी गेली 50 वर्षापासून अन्वरुल कुराण ही मदरसा अस्तित्वात आहे....सदर मदरसा सोबत गेली पन्नास वर्षापासून मुस्लिम धर्मीयांच्या धार्मिक भावना जुळलेल्या होत्या. एस आर ए मार्फत राबविले जाणारे प्रकल्पांमध्ये सदर मदरसा बाधित होत होती. सोसायटीची कमिटी मदरसाची कमिटी व स्थानिक रहिवासी यांचे मध्ये आपसामध्ये मदरसा निष्कासन करने वरून खूप मोठा वाद होता.. सदर प्रकल्पाची बांधकाम सुरू करण्यापूर्वी मदरसा निष्कासन करणे गरजेचे असल्याने विकासक प्रमोद पिसाळ यांनी दिनांक 16 सप्टेंबर 2025 रोजी सदर मदरसाचे निष्कासन करने करिता,

माननीय उपजिल्हाधिकारी (विशेष कक्ष) पूर्व उपनगरे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण बृहन्मुंबई यांचे पत्र देऊन मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त मागणी केली होती...

परंतु आगामी काळात साजरा होणारा नवरात्र उत्सव व आमच्या मार्फतीने काढलेले गोपनीय वृत्त आधारे विकासाचे प्रतिनिधी आसिफ मन्सूर खान सेक्रेटरी कुर्ला कदम हाउसिंग सोसायटी व श्री मोहम्मद हनीफ खान (सदर) अन्वरुल कुराण मदरसा .. यांचे सह जागृती नगर येथील बहुसंख्य मुस्लिम धर्मियांची तसेच पदाधिकाऱ्यांची पोलीस ठाणे एकत्रित बैठक आयोजित करण्यात आली होती..

त्यामध्ये त्यांच्यातील आपसातील मतभेद तसेच निर्माण होणारी कायदा व सुव्यवस्था व त्याचे दुष्परिणाम याबाबत त्यांना पोलीस प्रशासनामार्फत ठाम मत मांडणी करण्यात आली....

त्यामुळे मदरसाचे सदर व विकासाचे पदाधिकारी यांचे मध्ये आपसामध्ये एकमत होऊन , कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण न होता व एकही अधिकारी अथवा अंमलदाराची बंदोबस्त कामी नेमणूक न करता हि सदर मदरसा कमिटी मेंबर्स यांनी आज रोजी स्वतःहून संपूर्ण निष्कासित करून भोई सपाट केली आहे.



